# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ४९

## सभावृत्तांत

दिनांक - १९.०९.२०१५ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२०१५ ची मासिक मा. महापालिका सभा शनिवार दि.१९.०९.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.जगदीश शेट्टी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२२. मा.पवार संगीता शाम

२३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२४. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२५. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२६. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२७. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२८. मा.भारती फरांदे

२९. मा.आर.एस.कुमार

३०. मा.जावेद रमजान शेख

३१. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३२. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३३. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३४. मा.नंदा विकास ताकवणे

३५. मा.नेटके सुमन राजेंद्र

३६. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३७. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३८. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३९. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

४०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

४१. मा.लोंढे गणेश नारायण

४२. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४३. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४४. मा.अपर्णा निलेश डोके

४५. मा.अनंत सुभाष को-हाळे

४६. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४७. मा.पवार मनीषा काळूराम

४८. मा.प्रसाद शेट्टी

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.शेख अस्लम शैकत

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६३. मा.महेशदादा किसन लांडगे

६४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६५. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६८. मा.सावळे सिमा रविंद्र

६९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७१. मा.पालांडे सुजाता सुनिल

७२. मा.बहल योगेश मंगलसेन

७३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७४. मा.गिता सुशील मंचरकर

७५. मा.छाया जगन्नाथ साबळे

७६. मा.टाक अरुण मदन

७७. मा.वाघेरे सुनिता राजेश

७८. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८१. मा.काळे विमल रमेश

८२. मा.विनोद जयवंत नढे

८३. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८४. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८५. मा.विमलताई सुरेश जगताप

८६. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८७. मा.बारणे निलेश हिरामण

८८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८९. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंद्रू बारणे

९०. मा.बारणे माया संतोष

९१. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९२. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९३. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९४. मा.कलाटे स्वाती मयुर

९५. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९६. मा.चौंधे आरती सुरेश

९७. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

९९. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१००. मा.जवळकर वैशाली राहुल

१०१. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०२. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०५. मा.प्रशांत शितोळे

१०६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१०७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०९. मा.शेंडगे आशा सुखदेव

११०. मा.मोटे किरण बाळासाहेब

१११. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११२. मा.संजय केशवराव काटे

११३. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

११४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर - उपसंचालक नगररचना, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.गावडे - सह आयुक्त, मा.पाटील, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.गायकवाड, मा.कडूसकर, मा.माने, मा.दंडवते, मा.दुरगुडे - सहा.आयुक्त, मा.पवार - कायदा सल्लागार, मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.बरशेट्टी, मा.औंभासे, मा.गड्डूवार - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०५, चिंचवड विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थलांतरीत मतदार यांची प्रस्तावित वगळणी करावयाचे नावांचे हरकती/सुचनांसाठी सदरची बाब सर्व मा.नगरसदस्यांच्या अवलोकनार्थ/ निदर्शनास आणून देणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई/गव्हर्नन्स-३/कावि/८२/ २०१५ दि.७/८/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२१६९ दि.११/८/२०१५

३) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७३५ दि २५/८/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत राबविलेल्या सारथी उपक्रमाच्या धर्तीवर पुणे महानगरपालिके मार्फत तशाच प्रकारचे कॉल सेंटर कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. सदरचा उपक्रम हा पुणे महानगरपालिकेमध्ये प्रथमच चालू करावयाचा असुन त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिके मधील सद्दस्थितीत चालू असलेल्या सारथी कॉल सेंटरचे कामकाज कोणत्याही परिस्थितीत विस्कळीत न होता तेथील उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व संसाधने अंशत वापरुन पुणे महानगरपालिकेचे कॉल सेंटर प्रायोगिक तत्वावर सुरु करणेबाबत परवानगी मिळणेस विनंती केली आहे. सदरचे कॉल सेंटर प्रथमतः ६ महिने कालावधीसाठी सुरु करणेसाठी तसेच ऑपरेटर्ससाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत आयुक्त, पुणे म.न.पा. यांनी पत्रान्वये विनंती केली आहे. सदरच्या कामासाठी वापरल्या जाणा-या पायाभूत सुविधांचा अंशत वापर करुन सदरचे कॉल सेंटर सुरु करण्यास संमती मिळणेबाबत परस्पर सांमजस्य करार (MoU) पुणे महापालिकेतर्फे करण्यात येणार आहे. सदरप्रमाणे पुणे म.न.पा.चे कॉलसेंटरकरीता आवश्यक संगणक यंत्रणा, कॉल सेंटर Neon Software License Copy 6 Nos., हेडफोन, PRI लाईन, Grievance Monitoring System इत्यादी पुणे म.न.पा.ने पुरविण्यात यावी. कॉलसेंटर साठी लागणारी जागा व सर्व्हर फक्त ६ महिने कालावधीसाठी पिंपरी चिंचवड महापालिके तर्फे पुरविला जाणार आहे. सदरची बाब धोरणात्मक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७४९ विषय क्रमांक - १

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई/गव्हर्नन्स-३/कावि/८२/
२०१५ दि.७/८/२०१५

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२१६९ दि.११/८/२०१५

३) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७३५ दि २५/८/२०१५

विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र पअक/६/कावि/३१९/२०१५
दिनांक ०९/०७/२०१५

२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७२७ दि २३/७/२०१५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७(अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगत पूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधीचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल. अशा पध्दतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी मा.महापालिका सभेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या DPSIR या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा. महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१४-१५ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत आला.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज गौराई बसणार आहेत त्यामुळे जे जे चर्चेचे विषय आहेत ते आपण पुढच्या मिटींगला घेवू.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ तहकूब करणेत यावा अशी मी सूचना मांडते.

**मा.स्वाती साने -** मा.महापौर साहेब, तहकूबी सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ७५० विषय क्रमांक - २

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र पअक/६/कावि/३१९/२०१५ दिनांक ०९/०७/२०१५

२) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७२७ दि २३/७/२०१५

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७५१ विषय क्रमांक - ३

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. निवडणूक/१/कावि/३९४/२०१५ दि०१/०९/२०१५

मा.भारत निवडणूक आयोग यांच्याकडील पत्र क्र.२३/१/२०१५-ERSदि.२७/२/२०१५ व मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.सहमुनिअ-२०१५/०१३/३३ दि.१८/३/२०१५ नुसार दि.३/३/२०१५ पासून राष्ट्रीय मतदार यादी शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम(NERPAP)सुरु करण्यात आलेला आहे.सदर कार्यक्रमाअंतर्गत आधार क्रमांक व मतदार ओळखपत्र याची जोडणी नवीन मतदार नोंदणी,मतदार ओळखपत्रातील त्रुटींची दुरुस्ती मतदार वगळणी इ.कार्यक्रम सुरु केले आहेत. सदर कार्यक्रमांअंतर्गत उपरोक्त नमूद केलेप्रमाणे २०७, भोसरी विधानसभा मतदार संघा अंतर्गत १ ते ३४४ मतदान केंद्रातील मयत,दुबार व स्थलांतरीत मतदारांच्या वगळणीबाबत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (B.L.O)यांचेमार्फत मयत,दुबार व स्थलांतरीत मतदारांना नोटीसा बजविण्यात आल्या होत्या त्याबाबत प्राप्त झालेले जबाब,पंचनामे,तसेच अर्जांची छाननी करुन भोसरी विधानसभा मतदार संघातील मयत(१४१७),दुबार (६६३४) व स्थलांतरीत(३४६९१) असे एकूण ४२,७४२ मतदारांची वगळणी प्रस्तावीत असलेबाबत मतदार नोंदणी अधिकारी, २०७, भोसरी विधानसभा मतदार संघ यांनी त्यांचेकडील पत्र क्र. निवडणूक/कावि/२२१/२०१५ दिनांक-२०/०८/१५ अन्वये कळविले आहे.

२०७, भोसरी विधानसभा मतदार संघांतर्गत मतदान केंद्र १ ते ३४४ साठी प्रस्तावीत वगळणीची यादी मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय मा.CEO,महाराष्ट्र यांचे वेबसाईट (www.Ceo. maharashtra.gov.in) मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचे (www.pune.nic.in) व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (www.pcmcindia.gov.in)या वेबसाईटवर अवलोकनार्थ उपलब्ध होईल व प्रस्तावीत वगळणीबाबत मतदारास दिनांक-२८/०८/२०१५ रोजी सायं.५.३०वा. पर्यंत मतदार नोंदणी अधिकारी,२०७ भोसरी विधानसभा मतदार संघ, कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम नेहरुनगर,पिंपरी,पुणे-१८ यांचे कार्यालयात हरकती/ सुचना नोंदविण्यासाठी मुदत दिलेली आहे. सदर वगळणी प्रक्रीया दि.२८/८/२०१५ नंतर पूर्ण झाल्यानंतरही कोणत्याही मतदाराला दावे व हरकती दाखल करावयाच्या असल्यास ते नव्याने नमुना ६,७,८,८अ द्वारे मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयामध्ये दाखल करु शकतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०७, भोसरी विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थलांतरीत मतदार यांची वगळणीसाठी मतदारांच्या नावांची सी.डी. हरकती/सुचनांसाठी सदरची बाब सर्व मा.नगरसदस्यांच्या अवलोकनार्थ / निदर्शनास आणून देणेकामी मा.महापालिका सभेपूढे ठेवणेत आली.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मगाशी बोलल्याप्रमाणे १ के खालचा विषय आहे. याला जोडूनच तो विषय आहे तो चिंचवडचा विषय आहे हा भोसरीचा विषय आहे. गणपती महोत्सवाचा विषय आहे त्याची माहिती दयायला सांगावी.

**मा.महापौर-** गणपती महोत्सवाचा तो विषय पुढचा आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक तीन मंजूर करणेत यावा.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भोसरी मतदारसंघातील मतदार नावनोंदणीचा विषय आहे. यामधील ४० हजार नाव वगळण्याचा विषय आहे. दुबार, स्थलांतरीत आणि मयत असे नाव वगळलेले आहे. भोसरी मतदारसंघा मध्ये ज्या मतनिहाय यादया झालेल्या आहेत त्या यादयामध्ये आता जो तुम्ही विषय आणला त्यालाच अनुसरुन विषय सांगतो मतदारसंघात ज्या यादया आहेत बुथवाईज एक, दोन, तीन, चार त्या यादयामध्ये एका कुटूंबाचे नाव हे वेगवेगळया भागामध्ये डिव्हाईड झालेले आहेत. पाच ठिकाणी एकाच कुटूंबाचे नाव आहेत. याचा मला खुलासा पाहिजे नंतर बोलतो.

**मा.साहेबराव गायकवाड (मतदार नोंदणी अधिकारी भोसरी विधानसभा मतदारसंघ) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा डिलेशनचा विषय अवलोकनार्थ आपल्यासमोर ठेवलेला

आहे. भारत निवडणूक आयोगाने मतदार यादया जास्तीत जास्त क्लिअर करण्याच्या दृष्टिने कार्यक्रम हाती घेतलेला आहे. आता ४२,२७२ नावाची यादी डिलेट करित आहोत ते जरी झालेतरी आणखीन काही डिलेशन बाकी राहतच आहे. पण मोठया प्रमाणावर अशी मागणी होते की, काही नाव आढळतच नाहीत आणि असं झालेल आहे की भोसरी मतदारसंघातले बरेचसे लोक स्थलांतरीत होतात आणि सर्वच मतदारसंघात काम चालू आहे. आमची कारवाई पुर्ण झालेली असलीतरी मागच्या दोन तीन वर्षात ६० हजार नावे कट केलेली होती. आपल्याला माहिती असाव व स्थानिक संस्था म्हणून आम्ही येथे आपल्याला कळवित आहोत. मतदार यादीमध्ये दुरुस्ती करताना आपण मांडलेला मुद्दा बरोबर आहे की एकाच कुटूंबातील नावे एका पेक्षा जास्त केंद्रामध्ये आलेली आहेत. हे टप्याटप्याने होणार आहे एक दिवसामध्ये न होणारी गोष्ट आहे. याच्यामध्ये आता काही मतदानकेंद्र मोठी झालेली आहेत. मतदार वाढले त्याठिकाणी वाढीव २० मतदान केंद्र आपण वाढवतो. एकापेक्षा जास्त नाव मतदारसंघात गेलेले आहेत त्यासंदर्भात नाव ट्रान्सफर या केंद्रातून मुळ केंद्रात टाकण्यासाठी आपल्याला फॉर्म भरुन दयावा लागेल. त्याची मोहिम १ ऑक्टोबरपासून सुरु होईल. रिव्हाईज झालेल्या मतदारयादया सुध्दा आम्ही १ ऑक्टोबरला पब्लिश करु. रिव्हाईज झालेल्या मतदार यादया पाहून त्याप्रमाणे आपल्याला जे नाव ट्रान्सफर करायच आहे किंवा कुठल्या केंद्रात टाकायच आहे त्याचा फॉर्म भरुन दिलातर ते नाव ट्रान्सफर करुन देवू. ज्यांचे पत्ते अपुर्ण आहेत ती मोहिम सुध्दा आपण हाती घेतोत आणि कदाचित येणा-या प्रिन्ट मध्ये वाढीव पत्ते देखील येतील. त्यामुळे कदाचित त्याच केंद्रात परंतु वेगळया पत्त्यावर टाकण्यासाठी सुध्दा अर्ज भरला जावु शकतो त्यासाठी तुम्हांला अर्ज नमुना ८ चा फॉर्म आहे तो भरुन दयावा लागेल. हे मतदार यादयांच शुध्दीकरण कन्टिन्यू होत आहे. दरवेळेस ते केली जाणारी गोष्ट आहे. त्यामुळे आपण जी मोहिम घेवू उलट आपण शुध्दीकरणाच्या जास्तीत जास्त जवळ जातोत. म्हणूनच हा आपल्यासमोर विषय अवलोकनार्थ आणलेला आहे. तुमचे सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. एखादयाचे चुकून नाव वगळले असेलतर फॉर्म भरुन देता येईल.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. इलेक्शनला सामोरे जात असताना जो काही आम्हांला त्रास झाला आहे तो त्रास आपण निवडणूक आयोगाच्या माध्यमातून आलेला आहेत म्हणून आम्ही तुमच्या कानावर घालतो. माझे सजेशन आपल्याला आहे शिक्षकांचा पंधरा दिवसाचा प्रोग्रॅम केलातरी चालेल. याच्यापुर्वी सुध्दा आपला विषय झालेला आहे. आपण पत्रव्यवहार सुध्दा निवडणूक आयोग दिल्लीला केलेला आहे. माझी विनंती आहे की ज्या शिक्षकांवर जबाबदारी देतो त्यापेक्षा रिफ्रेश यादी म्हणजे पहिल्या घरापासून शेवटच्या घरापर्यंत त्यांची नावे घ्या. १८ वर्षे वयानंतरच्या मतदारांची प्रत्येक घरवाईज यादी तयार करा. यादी तयार करताना तुमची आणि ही यादी सगळया यादया रिफ्रेश आणि व्यवस्थीत होण्यासाठी माझी संकल्पना आहे. शिक्षकांना ते काम दयावे. पंधरा दिवसाचा

तो कार्यक्रम राबविला सगळया प्रभागामध्ये किंवा मतदारसंघामध्ये तर या यादया दुरुस्त झालेल्या दिसतील. जे नांव तुम्हांला डिलेट करायचे आहेत ते जागेवर पण नाहीत, आणि तुमच्या मतदार यादयामध्ये आहेत. ते कुठेतरी तुमच्या मतदार यादयामध्ये शेवटच्या टप्यात टाका. म्हणजे आम्हांलाही समजेल की ही नाव ऑलरेडी आहेत पण समाविष्ट नाहीत. ॲकच्युअली यादीमध्ये जे नाव आहेत ते रितसर गल्लीवाईज आलीतर ते आम्हांलाही सोप होईल. म्हणून माझी तुम्हांला विनंती आहे की हा जो काही प्रोग्राम केलेला आहे त्याला माझा विरोध नाही. जे नसतील ते डिलेट झालेतरी हरकत नाही. शिक्षकांना एवढा त्रास होतो, माझ्या घरा शेजारी चार नाव सापडत नाहीत ते दुसरीकडे ट्रान्सफर झालेले आहेत. एकाच लाईनला नाव आलेतर आम्हांला शोधण्यासाठी सोपे होईल आणि तुम्हांलाही सोपे होईल. म्हणून माझी विनंती आहे की हा प्रोग्राम लावला, रिफ्रेश यादीचा तर चांगले होईल. १९९७-९८ ला घर टू घर जावुन ती नावे तुम्ही पिवळी कॉपी, लाल कॉपी दिलेली आहे. तशी तुम्ही घरटू घर नाव घ्या. तुमची तशी यादी तयार करावी.

**मा.साहेबराव गायकवाड (मतदार नोंदणी अधिकारी भोसरी विधानसभा मतदारसंघ) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारत निवडणूक आयोगाला रिव्हीजन घ्यायचे असेलतर देशपातळीवर प्रोग्राम घ्यावा लागतो. तो घेतलातर आपल्याकडे सुध्दा होईल. ब-याचशावेळेस आपल्याकडुन मागणी असुन सुध्दा आम्ही नाव डिलेट केली नव्हती. कारण एक जरी नाव कट झालतर आम्हांला त्रास होतो. पण हे सगळ डिलेट होण्याचा भारत निवडणूक आयोगाने प्रोग्राम घेतला असता आपण म्हणतात तसं सगळ होईल. पुर्वी झालेल होत त्याला बरीच वर्षे लोटलेली आहेत. निवडणूक आयोग जेव्हा घेईल तेव्हा तो आपल्याकड पण होईल. तोपर्यंत आहे ती यादी करता येईल.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, आमची ही मागणी आहे ती तिथपर्यंत पोहचवा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७५२ विषय क्रमांक - ४

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र. पअक/३/कावि/३७०/२०१५ दि. २/०९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात गणपती व नवरात्रौत्सव, रमझान महिना, बकरी ईद, रमझान ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धर्मीय उत्सव, सण रस्त्यांवर साजरे केले जातात.

याबाबत डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १७३/२०१० अन्वये मा.उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करताना रहदारीस अडथळा होणार नाही, तसेच ध्वनी क्षेपकामुळे होणारे प्रदूषण नियंत्रित करणे व नागरीकांसाठी प्रभावी प्रकारे तक्रार स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहेत व निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत मा.मुख्य सचिवांकडे धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत विचारणा केली आहे. या उत्सवादरम्यान मोठ्या प्रमाणात मंडप उभारण्यासाठी विविध संस्था, सार्वजनिक मंडळे इत्यादी मनपाकडे परवानगीसाठी अर्ज करतात.

त्यास अनूसरुन, सार्वजनिक उत्सवाच्या वेळी बहुतेक मंडळे ही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावरच मंडप उभारणी करतात, अशावेळी परिसरात असलेल्या नागरिकांना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवामध्ये तात्पुरत्या स्वरुपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये, तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरीक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातून मा.उच्च न्यायालयाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सुधारितमार्गदर्शक तत्वे व कार्यालयीन पध्दती तयार करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये, ध्वनी प्रदूषण होऊ नये व रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही. त्याचप्रमाणे मा.उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे दिशा निर्देशाची सार्वजनिक मंडळाकडून तपासून मंडप उभारणे बाबत उचित पालन होण्यासाठी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून आणि जनजीवन विस्कळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत. तसेच सदर

प्रकरणी नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करणेत येत आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अन्वये मा.पोलिस आयुक्त यांच्या सहमतीने मनपा परिसरामध्ये तात्पुरत्या स्वरुपातले स्टेज/मंडप याकरीता परवानगी देताना सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करणेच्या धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर -** या विषयाची माहिती दयावी.

**मा.संजय कुलकर्णी (कार्यकारी अभियंता पर्यावरण विभाग) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहरामध्ये सार्वजनिक उत्सवाच्या वेळेस मंडपाला परमीशन देताना काय मार्गदर्शक तत्व असावीत या विषयी मा.उच्च न्यायालयात डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १७३/२०१० यामध्ये मा.उच्च न्यायालयाने सर्व माहापालिकांना काही मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणीसाठी धोरण तयार करण्याचे आदेश दिलेले होते त्यानुसार त्यांनी दिलेल्या आदेशामध्ये आम्ही नमुद केलेले सगळे पॉईंट ग्राहय धरुन महापालिकेनी तात्पुरत्या मंडपासाठी आणि ध्वनीप्रदुषण होवू नये यासाठी सर्व बाबींचा विचार करुन धोरण तयार केले आणि त्याची प्रत मा.उच्च न्यायालयास आणि महाराष्ट्र शासनास सादर केली आहे. त्याप्रमाणे या वर्षी सर्व प्रभाग अधिका-यांना सांगून सार्वजनिक गणेश उत्सवाच्या मंडपास परवानगी दिलेली आहे. त्या मार्गदर्शक तत्वाला मंजूरी देण्यासाठी ही मार्गदर्शक तत्वे महापालिका सभेसमोर सादर केलेली आहेत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.नरवि/कावि/१८/५८/ २०१५ दि.८/९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीवहद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेत मौजे तळवडे ता. हवेली जि. पुणे, त्रिवेणीनगर चौक हद्दीतून जाणा-या मंजूर विकास य़ोजनेमधील ९०.० मी. स्पाईन रस्त्याच्या भूसंपादनाबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सन २००५ मंध्ये सादर करणेत आला आहे. सदर स्पाईन रस्ता हा प्राधिकरण हद्द,तळवडे हद्द व पुन्हा प्राधिकरण हद्द यानुसार विभागत आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे क्षेत्रात सदर ९०.० मी.रस्त्याच्या दोन्ही बाजूस ७५.० मी.रूंद रस्ता विकसित करणेत आल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतही ७५.० मी.रूंद रस्ता विकसित करणेबाबत मा.महापालिका सभेने ठराव पारित केला आहे. तदअनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ नुसार फेरबदलाची वैधानिक कार्यवाही सुरू केलेली आहे. परंतु जागेवरील प्रत्यक्ष आखणीनुसार प्राधिकरण व महानगरपालिकेच्या ७५ मी. आखणीत तफावत असल्याने काही नागरिकांचा सदर आखणीस विरोध आहे. त्यामुळे प्रस्तावित ७५ मी. रूंद रस्त्यापैकी प्रथम टप्पा अंतर्गत ५२.० ते ६०.० मी.रस्त्याचे भूसंपादन चालू करणेत आले आहे. व सदर भूसंपादनापोटी भूमिसंपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१ यांचे कार्यालयाकडून मागणी केलेनुसार जमिनीचा मोबदला रकमेपोटी रक्कम रू.७,९३,५७,३४९/- इतकी रक्कम दि.२८/०५/२०१३ पर्यंत जमा करणेत आली आहे.

सदर ५२ ते ६० मी. रस्त्यामंध्ये अस्तित्वातील घरे आहेत. प्राधिकरण हद्दीतील ७५ मी. स्पाईन रस्त्यामधील बाधित होणा-या मिळकतधारकांचे ज्या प्रकारे पुनर्वसन करणेत आले,त्याच पद्धतीने महानगरपालिकेच्या हद्दीतीलही मिळकतधारकांचेही पुनर्वसन करणेत यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी केलेली आहे, तसेच लोकप्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत पुनर्वसनाबाबतच्या आवश्यक त्या भूखंडाची मागणी प्राधिकरणाकडे करावी,असे ठरले. प्रस्तृत प्रकरणी प्राधिकरणाने जागा देणेची तयारी दर्शविल्याने विशेष बाब म्हणून बाधितांचे पुनर्वसन होऊ शकते.त्यानुसार तत्कालीन परिस्थितीत बाधित होणा-या बांधकामाचे क्षेत्रानुसार तीन प्रवर्ग धारकांची यादी प्राथमिक स्वरूपात तयार करणेबाबत ठरले आहे, व त्यानुसार खालीलप्रमाणे वाटप करण्यात येणा-या भूखंडाच्या क्षेत्राची वर्गवारी करणेत आली आहे.

१) ० ते ५०० स्के.फूटापर्यंत बांधकामाने बाधित होणा-या मिळकतधारकांसाठी द्यावयाचे भूखंड क्षेत्र- ५०० स्क्वे.फूट

२) ५०१ ते ७५० स्के.फूटापर्यंत बांधकामाने बाधित होणा-या मिळकतधारकांसाठी द्यावयाचे भूखंड क्षेत्र- ७५० स्क्वे.फूट

३) ७५१ स्क्वे.फूट ते पुढील बांधकामाने बाधित होणा-या मिळकतधारकांसाठी द्यावयाचे भूखंड क्षेत्र- १००० स्क्वे.फूट

यापूर्वी प्राथमिक स्वरूपात सुमारे १११ बाधित मिळकतधारकांची माहिती प्राप्त झाली होती. व सदर मिळकतधारकांचे बाधित होणारे बांधकाम क्षेत्रानुसार, प्राधिकरणाकडे सुमारे १.४२ हेक्टर जागेची मागणी करणेत आली होती.त्यानुसार प्राधिकरणाकडून संबधित बांधकाम बाधित मिळकतधारकांना पर्यायी जागा देणेबाबत शासनाची मंजूरी घेणेबाबत प्रस्ताव सादर केला होता.सदर प्रस्तावाबाबत शासनाने बाधित होणा-या मिळकतधारकांची यादी कळविणेबाबत मागणी केली होती.

तदअनुषंगाने बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांचे पुन:श्च सर्वेक्षणानुसार सुमारे १२६ मिळकतधारकांची माहिती प्राप्त झाली.संबधित मिळकतधारकांचे करसंकलन विभागाकडील मिळकतींचे प्राप्त क्षेत्रानुसारची यादी प्राधिकरणांस कळविणेत आलेली आहे. वर नमूद केलेप्रमाणे तीन प्रवर्गात सदर विभागणी करणेत आली. त्यानुसारची माहिती पुढीलप्रमाणे

१) ० ते ५०० स्के.फूटापर्यंत बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांसाठी संख्या- ४९

२) ५०१ ते ७५० स्के.फूटापर्यंत बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांसाठी संख्या-१९

३) ७५१ स्क्वे.फूट ते पुढील - बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांसाठी संख्या – ५८

एकूण संख्या-१२६

तथापि विद्यमान लोकप्रतिनिधी व नागरिक यांनी प्रत्येकी १२५०चौ.फूटाचा मोकळा भूखंड मिळण्याची मागणी केलेली आहे तथापी ते शक्य नसल्याने देण्यातयेणा-या भूखंडास २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) मंजूर करावा, अशी मागणी केली आहे. सदर बहुतांश बाधित मिळकतधारक हे आर्थिकदृष्टया कमकुवत असून त्यांची अस्तित्वातील घरे निष्कासित करणेत येणार असल्यामुळे महानगरपालिकेकडून २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाची (एफ.एस.आय.) मिळणेविषयी प्राधिकरणाकडे मागणी केलेली आहे.

प्राधिकरणाने पाठविलेल्या पत्रात नमुद केल्यानुसार से.क्र.२ मधील बल्क लँड क्र.१ ते ४ क्षेत्र १४७५४ चौ.मी. जागा प्रचलित निवासी दराने आकारणी करून महानगरपालिकेस थेट

वाटप करणेस शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून आवश्यक त्याबाबींची पूर्तता करून घेवून जागा वाटपाची कार्यवाही करावी. तसेच उपरोक्त नमूद क्षेत्र महापालिकेला हस्तांतरीत करणेपूर्वी सन २०१५-१६ च्या प्राधिकरणाच्या शिघ्रसिद्ध गणकाच्या दराने अधिमूल्य र.रू.१६,५२,११,२००/- प्राधिकरणाचे कार्यालयात ३ महिन्याच्या मुदतीत रोख अथवा डिमांड ड्राफ्टने चलनाने जमा करावी. तसेच या मुदतीत उपरोक्त रकमेचा भरणा केला नाही तर थकीत रकमेवर १४% दराने १ महिना कालावधीसाठी विलंब शुल्क आकारून मुदतवाढ दिली जाईल सदर रकमेवर प्रचलित नियमाप्रमाणे व दराने सेवा कराची रक्कम महापालिकेला भरावी लागेल असेही उपरोक्त पत्रात स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

सदर स्पाईन रस्ता प्राधिकरण हद्दीत विकसित झालेला असून, महानगरपालिका हद्दीत विकसित झालेला नसल्याने वाहतूकीस अडथळा होत आहे त्यामूळे सदर रस्त्याचा विकास होणेची तातडी लक्षात घेता व बाधित क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेकरिता, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेसमवेत वेळोवेळी बैठका आयोजित केलेल्या आहेत.

वर नमुद प्रथम टप्पा अंतर्गत ५२ ते ६० मी. रस्त्यासाठीचे भूसंपादनापोटी भूमि संपादन अधिकारी, विशेष घटक क्र. १ यांचेकडे आजपर्यंत म.न.पा.कडुन रू. ७,९३,५७,३४९/- इतकी रक्कम भरणेत आलेली आहे, व बाधित बांधकाम मिळकतधारकांचे पुनर्वसनासाठी प्राधिकरणाकडे भूखंडासाठी भरावी लागणारी रक्कम रू.१६,५२,११,२००/- व तदअनुषंगिक खर्च अशा दोन प्रकारे मोबदला रक्कम सद्यस्थितीत अदा करावी लागत आहे.तथापि भूसंपादनापोटी दोनदा मोबदला देणेची तरतूद नाही, त्यामुळे तुर्त ररू.१६,५२,११,२००/- व तदअनुषंगिक खर्चाची रक्कम महानगरपालिकेकडून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास अदा करावी वती बाधित बांधकाम मिळकतधारकांकडून त्यांच्या बाधीत होणा-या भूखंडाचा ताबा घेवून त्यांना लागू होणारी मोबदला रक्कम वजा करून उर्वरित रक्कम वसुल करणे विषयी धोरणात्मक निर्णय घ्यावा,असे वाटते. तसेच जागेचा ताबा मिळाल्यानंतर भूसंपादनातून सदरचे क्षेत्र वगळून त्यांचेकडे जमा केलेली रक्कम परत मिळू शकते.

रक्कम रू.१६,५२,११,२००/- इतकी रक्कम व तदअनुषंगिक खर्चाची (उदा. सेवा कराची रक्कम इ.) रक्कम प्राधिकरणाकडे भरणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन, सदरच्या खर्चास मा. स्थायी समिती सभेचीही मंजूरी घ्यावी लागेल. या सर्व मंजूरी घेण्यासाठी वेळ लागणार आहे. सबब सदर रक्कम भरणेकामी विलंब शुल्क न आकारता मुदतवाढ देणेबाबत प्राधिकरणांस कळविणेत आले आहे.

सबब वर नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे तळवडे ता. हवेली जि. पुणे येथील त्रिवेणीनगर चौक येथून जाणा-या स्पाईन रस्त्यामध्ये बाधित मिळकतधारकांच्या पुनर्वसनासाठी जागा वाटप करणेकामी, प्राधिकरणाकडे से.क्र.२ मधील बल्क लँड क्र.१ ते ४ क्षेत्र १४७५४ चौ.मी. चे भूखंडापोटी रक्कम रूपये १६,५२,११,२००/- व तदअनुषंगीक खर्च (उदा. सेवा कराची रक्कम, रजिस्ट्रेशन फी, वकील फी, भूमि अभिन्यास तयार करणेकामीची फी, इत्यादी) करणेचे, तसेच प्राधिकरणाकडून भूखंड म.न.पा.कडे हस्तांतरीत केलेनंतर प्राधिकरणाचे नियमानुसार रेखांकन तयार करणेसाठी व वेळोवेळी फेरबदल करणे, मंजूरी घेणे, जागा वाटप करणे, भूखंडाचे मुल्यांकन निश्चित करणे, रक्कम वसूल करणेचे अधिकार इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देणे या प्रयोजनासाठी, मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महेशदादा लांडगे -** आदरणीय महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार बंधु. स्पाईन रोडच्या संदर्भात हा विषय आहे. २०१३ साली या स्पाईन रोडसाठी बरेचशी घरे आपण पाडली आहेत. त्याठिकाणाहून पाण्याची लाईन नेलेली आहे. २०१३ ला हा प्रस्ताव महापालिकेकडून प्राधिकरणाला गेला होता. प्राधिकरणाने तो प्रस्ताव त्यांच्या नियमात मंजुर करुन शासनाकडे पाठविला. शासनाकडे गेल्यानंतर हा प्रस्ताव मंजूर होवून आलेला आहे. माझी विनंती आहे की हा विषय मंजूर करावा. त्याचप्रमाणे यामध्ये राहणा-या नागरीकांना ज्या धरतीवर अंकुशनगर आणि शरदनगरला प्राधिकरणाने पुनर्वसन केले त्या धरतीवरच हे करावे आणि महाराष्ट्र शासनानाकडे जो पहिला प्रस्ताव होता तेवढाच रस्ता विचारात घ्यावा. हा विषय मंजूर करावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे याला उपसूचना त्या भागातील नगरसेवक मा.अरुणा भालेकर आणि मा.सुरेश म्हेत्रे देतील ती स्विकारण्यात यावी. कारण ब-याचशा वर्षापासून या भागातील नागरीकांचे ज्यावेळेला पाईपलाईन झाली त्यावेळेला पुनर्वसन करायला पाहिजे होते ते केलेले नाही ते लोक आज सुध्दा पत्राशेडमध्ये, भाडयाने राहतात. त्यांच्या हक्काचे घर महापालिकेनी पाडलेले आहेत आपल्या महापालिकेच्या फायदयासाठी पाडली आहेत. त्यांच्या जागेतून पाईपलाईन जाणार होती. ती पाईपलाईन पुढे जावुन प्रत्येक नागरीकांना पाणी मिळणार होतं. वैयक्तिक असा कोणाला त्याचा फायदा होणार नव्हता. महापालिका हद्दीत राहणा-या नागरीकांना फायदा होण्यासाठी ती घरे पाडली. त्या घरातील लोकांना मोबदला नुकसानभरपाई म्हणून देण्यात यावा अशी त्यांची उपसूचना आहे ती वाचण्यात येईल ती स्विकारावी अशी मी विनंती करतो.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जुन्या सगळया सदस्यांना आठवत असेल की हा विषय सात ते आठ वर्षापासून या सभागृहा पुढ येतो. प्रभाग समितीसमोर हा विषय ब-याच वेळा चर्चा झाली, ठराव विखंडीत झाले, पुन्हा ठराव झाले. ही

चुक प्रशासनाची असल्यामुळे आपल्याला सगळयांना माहिती आहे, ठाकूर साहेब नवीन आहेत त्यामुळे त्यांना याची जास्त कल्पना नाही. परंतु प्राधिकरणाने याचा सगळयात आदि डीपी बनवलेला होता. ७५ मीटरचा तो डीपी होता त्यावेळेस काही आखण्या केल्या आणि त्यानुसार जो काही रस्ता सोडून जी जागा उरते त्याच्यावरती परमीशन घेवून घर बांधली ती बांधल्यानंतर जेव्हा महापालिकेचा डीपी तयार झाला तो ९० मी.चा झाल्यानंतर महापालिकेनी स्वत:ची परत लाईन आखली आणि प्राधिकरणाचा डीपी वगळून टाकला त्यावेळेला तो ९० मी. डीपी रस्ता एवढा मोठा झाला. पाठीमागे, पुढे प्राधिकरण आहे. दोन्ही ठिकाणी ७५ मी. चा रस्ता आहे आणि त्या रस्त्याची तोंडमिळवणी होत नाही. महापालिकेनी स्वत: ३७ ची कार्यवाही केली. कोणत्याही नागरीकांनी ३७ ची कार्यवाही करा असे म्हणलेले नव्हते. परंतु प्रशासनाची चुक होती त्यावेळेला महापालिकेनी वेगवेगळे कळविलेले आहे. पहिल्यांदा सर्वेक्षण केल त्याच्यामध्ये १११ मीळकती सांगीतल्या, अंतीम सर्वेक्षणामध्ये १२६ मीळकती सांगीतल्या आणि आता १३८ मिळकती जवळ जवळ त्या जागेवर आहेत. मा.महापौर साहेब, विषय मंजूरीला आलेला आहे विषयाला माझा आजीबात विरोध नाही. मला एक सांगायचे आहे की यामध्ये ज्यांची घरे जातात ते अत्यंत म्हणजे, धड त्यांना झोपडपट्टीत राहणारे म्हणता येत नाही आणि बंगल्यामध्ये राहणारे म्हणता येत नाहीत. ते अत्यंत सर्वसाधारण आणि गरीब नागरीक आहेत. त्यांनी कोर्टाची सुध्दा लढाई लढलेली आहे. हायकोर्टाने महापालिकेला आदेश दिलेले आहेत की जे मिळकतधारक आहेत त्यांची आपण काय व्यवस्था करणार आहेत हे येणा-या चार आठवडयात कळवावे असे सांगीतलेले आहे. २०१३ ला सांगीतले अजूनपर्यंत हायकोर्टाला कळविलेले नाही की या लोकांना आपण नक्की काय देणार आहोत. ३७ ची कारवाई करुन मंजूर केलेला विषय ती ३७ ची कारवाई आपण अजून शासनाकडे पाठविलेली नाही. तो प्रस्ताव अजून शासनाकडे पाठवलेला नाही. शरदनगरच्या धरतीवर हा स्तूत्य विषय आहे की आपण त्यांना जागेच्या मोबदल्यात जागा देतो. तत्कालीन आमदार असतील किंवा त्याच्या अगोदरचे महापौर असतील या सगळयांनी यासाठी प्रयत्न केलेला आहे परंतु ते देत असताना या नागरीकांची अशी मागणी आहे १२५० स्क्वे.फुट जे शरदरनगरच्या लोकांना दिलेली आहे तेवढी १२५० स्क्वे.फुट जागा यांना पाहिजे परंतु आपण त्यांच्या मागणीकडे लक्ष देत नाहीत. ७५ मी. प्राधिकरणाच्या आखणीप्रमाणे जागा दयायचा विषय केला असतातर दोन एक्कर जागा आपली वाचली असती त्याची कोटयावधी रुपये किमंत आहे त्यामध्ये तुम्ही घरकुल केले असते परंतु असो आपण सगळयांचा मध्य म्हणून ५२ ते ६० मी. हा विषय घेतलेला आहे. याच्यामध्ये ही कॉमनस्पेस आहे. ५२ ते ६० मी. ही कॉमनस्पेस आहे परंतु विषय अत्यंत चातूराईने ठेवलेला आहे. प्रथम टप्प्यात ५२ ते ६० मी.असं म्हणलेले आहे याचा अर्थ दुस-या टप्प्यामध्ये ७५ मी. येणारच आहे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला अशी विनंती आहे की ५२ ते ६० हा पाऊन कि.मी.चा रस्ता आहे. जास्त मोठापण नाही पुढे मागे ७५ मी. आहे बरोबर आहे. महापालिकेनी

३७ करुन ७५ केल आहे ते पण बरोबर आहे. रस्त्याची तोंडमिळवणीच नाही. ३७ करताना झोपडपट्टी संपल्यानंतर त्रिवेणीनगर जेव्हा सुरु होतं त्याच्यानंतर ९० मी. आखणी बघीतलीतर पुर्ण काटकोण जातो. कशासाठी हा काटकोनाचा रस्ता वळवला. पाऊण मी. रस्ता तुम्ही वळवलेला आहे. त्याच्यापेक्षा ५२ ते ६० मी. केलातर निदान तो रस्ता सरळ होईल आणि त्याच्या पुढचा जो दुसरा टप्पा आहे तो वगळावा फक्त ५२ ते ६० मी.एवढेच याठिकाणी मंजूर करावा. आडीच एफएसआय तुम्ही देणार म्हणताय नागरीकांच्या मिटींग झाल्या. तुमच्याकडे शाश्वती आहे का आजच्या या मिटींगमध्ये आडीच एफएसआय मंजूर होईल. तुम्ही ५०० मी. जागा देणार, कुणाला १ हजार स्क्वे.फु. देणार आहेत, कुणाला ७५० स्क्वे.फुट देणार आहेत. पण आडीच एफएसआय देवून त्यांना याठिकाणी गाजर दाखवले आहे. ३७ ची कारवाई अजून पुर्ण नाही. रेडझोनचा मुद्दा अजून क्लेअर झालेला नाही. आडीच एफएसआय झाला नाहीतर त्याला कोण जबाबदार आहे, आडीच एफएसआय होवून ती पुर्ण झोपडपट्टीच होणार आहे. ५०० स्क्वे. फुटामध्ये आडीच एफएसआय बांधायचं म्हणजे ती पुर्ण अशी चिंचोळी बिल्डींग होईल आणि त्याच्यामध्ये आपण सुविधा कशा देणार. त्याच्यापेक्षा १२५० दिलेतर त्यांच्या स्वत:च्या जागेवर ते बांधु शकतील. त्यांचा जो जागेचा मोबदला आहे तो त्यांना तात्काळ देण्यात यावा आणि ५२ ते ६० मी.एवढाच रस्ता करावा अशी माझी सभागृहाच्या वतीने हात जोडून विनंती आहे. प्रथम टप्पा म्हणलेले आहे म्हणजे ७५ मी. ला मंजुरी आहे नंतर तुम्ही दुसऱ्या टप्प्याची कारवाई करणार म्हणजे करणारच. हायकोर्टाचा जो आदेश आलेला आहे त्याचे काय करणार आहेत हे सांगावे. एकही प्रस्ताव शासनाकडे अजून पाठविलेला नाही जो पाठविलेला आहे तो विखंडीत होवून आलेला आहे. मग अशा सर्व गुंतागूंतीच्या प्रकरणामध्ये प्रत्येकजण आपआपली जबाबदारी झटकून पुढे जातो परंतु परिणाम जे आहेत ते शेवटच्या नागरीकांना भोगावे लागणार आहेत. आपणच सार्वभौम आहोत आपले सगळे अधिकार याठिकाणी आहेत परंतु जर तुम्ही म्हणलेल आहे की ५२ ते ६० मी. प्रथम टप्प्यामध्ये तरी प्रथम आणि अंतीम टप्प्यामध्ये सुध्दा ५२ ते ६० मी. असाव आणि १२५० अशी जागा त्यांना मिळावी अशी माझी विनंती आहे.

**मा.तानाजी खाडे -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. स्पाईन रस्त्याचा विषय आहे. त्या परिसरातील नागरीकांची घरे जातात त्यांना मोबदला देण्याचा विषय आहे त्याला माझा कुठलाही विरोध नाही. त्यांना मोबदला मिळाला पाहिजे. परंतु प्राधिकरण आज आपल्याकडे या जागेचे पैसे मागते. प्राधिकरण रस्ता विकसीत करते. आपल्या महापालिकेच्या जागेच्या मधुन तो रस्ता चाललेला आहे तो विकसीत करणे प्राधिकरणाचे काम आहे. सभागृहाला विनंती आहे की प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये काही झोपडपट्टया होत्या. स्पाईन रस्त्यामध्ये आलेल्या झोपडपट्टयांना त्यावेळेस काढल गेल त्याठिकाणी ४०० ते ४५० झोपडया होत्या. त्या झोपडया से.२२ मध्ये टाकल्या त्यांचे पुनर्वसन महापालिकेनी करायचे धोरण ठरले. लोकांना पात्र सुध्दा करण्यात आलेलं आहे. प्राधिकरणाच्या जागेवर असलेल्या झोपडपट्टीचे

पुनर्वसन आपण करतो मग आपल्या जागेत घर असतीलतर प्राधिकरणाने त्याच का पुनर्वसन करु नये. जो स्पाईन रस्ता चाललेला आहे, भक्ति-शक्ती पर्यंत आलेला आहे, तिथून माझ्या भागात रस्ता आलेला आहे. भक्ति-शक्ती चौकामध्ये प्राधिकरणाने करायचे का महापालिकेनी करायचे याच्यामध्ये ब-याचशा लोकांचा ॲक्सीडेंट झालेला आहे. त्याठिकाणी बरेचसे लोक गेलेले आहेत. अंकुश चौक, त्रिवेणीनगर चौक, चिकन चौक आहे त्याठिकाणी स्पिडब्रेकर नाही. त्याठिकाणच्या झोपडपट्टीचे पुनर्वसन केले, प्राधिकरणाकडून काही मोबदला घेतला का आणि या तीन चौकामध्ये स्पिडब्रेकर असेलतर याची माहिती दयावी.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा स्पाईन रस्त्याचा जो विषय आहे त्याठिकाणाहून लोकांना पिण्याच्या पाण्याच्या लाईनसाठी १८ ते १९ लोकांच्या मिळकती पाडलेल्या आहेत. अक्षरश: ती सर्व लोक रिटायर्ड आहेत त्यांना घरभाडे सुध्दा भरता येत नाही. ते लोक मंदीरात जाणार नाहीत पण आमच्या नगरसेवकांच्या घरी रोज येतात, रडतात आमच्या मिळकतीच काय करता म्हणतात. सभागृहाला विनंती राहील की हा विषय लवकरात लवकर मंजूर करावा.

**मा.सिमाताई सावळे -** सन्मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रथमत: जे जे लोक या रस्त्यामुळे बाधीत होत होती त्यांच्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे अभिनंदन करते. अत्यंत चांगला विषय सभागृहापुढे आलेला आहे. चांगल यासाठी म्हणेल की, आपले घर स्वप्न असते ते तुटत असेलतर झोप लागत नाही. स्पाईन रोडचे जेवढी लोक आहेत त्यांनी २००७ पासून आतापर्यंत स्थानिक नगरसेवक असतीलच पण आम्हांला सुध्दा त्यांनी विनंती केली की यामध्ये तुम्ही लक्ष घालावे म्हणून. मा.महापौर साहेब, याठिकाणी खरेतर मी युतीशासनाचे अभिनंदन करण्यासाठी याठिकाणी उभी आहे. मागील पाच वर्षात या विषयासोबत अनेकवेळा चर्चा झाली. आता सुलभाताईने सांगीतले की अनेकवेळा ठराव सुध्दा विखंडीत झालेले आहेत. त्या गोरगरीबांच्या बाजूने न्याय देण्याचे काम युतीशासन करत आहे आणि म्हणूनच शासनाने नियमाच्या पलीकडे जावुन माणूसकीचा दृष्टिकोन ठेवून हा विषय मंजूर केला आहे युतीशासनाच मी याठिकाणी अभिनंदन करते. मा.महापौर साहेब, शंभर टक्के याठिकाणी युतीशासनान काम केलं म्हणून युतीशासनाच अभिनंदन. २०१५ ला झालेला हा ठराव आहे. शासनाने मंजूर करुन पाठवलेला आहे. जिल्हाधिकारी यांनी विषय मंजूर केला म्हणूनच शासनाचे अभिनंदन करणे गरजेचे आहे. लोकांच घर त्यांच्या डोक्यावर छप्पर रहावे ही प्रामाणीक भावना याठिकाणी, यामध्ये काम करणा-या सगळयाच लोकांची होती आणि म्हणून याठिकाणी त्या सगळया लोकांचे अभार मानले पाहिजे, अभिनंदन केले पाहिजे. स्पाईन रोडमध्ये ज्या ज्या लोकांची घर जातात त्या ५२ ते ६० मी.चे जे रेखांकन आहे ते कायमस्वरुपी तसेच रहावे यामध्ये फेरबदल करण्यात येवू नये एवढच याठिकाणी मी सांगते. ज्या लोकांना घराची जागा मिळणार आहे त्यांनी ती आनंदाने घ्यावी. ज्या ज्या लोकांनी प्रयत्न केले, ज्यांनी

शासन दरबारी हा विषय लावून धरला तुम्ही त्यांचे आभार माना हा तुमचा हक्क आहे आणि तो आज मिळतोय आणि तुम्हांला तो खुप लवकर मिळाला म्हणून शासनाचे पण आभार माना. स्पाईन रोडचे बरेचसे लोक याठिकाणी आलेले आहेत. एक हजार स्क्वे.फुट, बाराशे स्क्वे.फुटाची मागणी आहे परंतु ते मान्य होवू शकत नाही परंतु जे झालेले आहे ते घ्यावे एवढच याठिकाणी सांगते. परत युतीशासनाचे अभिनंदन करते आणि थांबते जयहिन्द, जयमहाराष्ट्र.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा स्पाईन रस्त्याचा प्रश्न आहे. भक्ति-शक्ती ते पुणे-नाशिक हायवेपर्यंत जाणारा हा रस्ता आपल्या महापालिका क्षेत्रातील त्रिवेणीनगर येथे केवळ ४०० मी.चा रस्ता थांबून राहीलेला आहे. अनेक वर्षापासून प्रलंबीत असलेला हा विषय मार्गी लागावा म्हणून अनेक सदस्य तसेच माजी आणि आजी आमदार यांनी आमच्या सोबत अनेक बैठका घेवून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. हा विषय जो आहे तो प्राधिकरणांनी यांना पुनर्वसन करण्यासाठी जी जागा देवू केलेली आहे त्या विषयासंबंधीत आहे. सदर जागा महापालिकेनी ताब्यात घेवून या नागरीकांचे त्वरीत पुनर्वसन करावे. कारण ते नागरीक आजच्या परिस्थितीत अतीशय हालाकीचे जीवन जगत आहेत म्हणून मी उपसूचना देतो ती मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- विषयांकित स्पाईन रस्त्याचे रुंदीकरणातील त्रिवेणीनगर चौक येथील प्रस्तावित ७५ मी.रुंद रस्त्यापैकी सामाईक आखणीप्रमाणे प्रथमत: ५२ ते ६० मी. रुंदीनुसार प्रत्यक्षात बाधित होणा-या मिळकतधारकांचे प्राधिकरणाने शरदनगर अंकुश चौक या भागात केलेल्या पुनर्वसनाचे धर्तीवर प्राधिकरणाकडून मिळणा-या वरील भुखंडावर पुनर्वसन करावे. बाधित मिळकतधारकांबरोबर मोकळया असलेल्या भुखंडधारकांची ही यामध्ये गणना करावी व हे भूखंड विनामुल्य मिळावेत याबाबत बाधित लोकांकडुन कुठलाही मोबदला घेणेत येऊ नये. तसेच यापुर्वी पाण्याच्या पाईपलाईन टाकातांना सन २०१३ साली जी बांधकामे यापुर्वीच काढुन टाकणेत आली आहेत त्या सुमारे १८ बांधकाम मधील लोक हलाकीच्या परिस्थितीत खाजगी भाडयाने राहत आहेत. त्यांचे २०१३ पासुन आजपर्यंत झालेल्या खर्चापोटी म.न.पा. नियमाप्रमाणे नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्वरित कार्यवाही करावी.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी विषय मांडलेला आहे. सभागृहात सर्वांनी मंजूरी देण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि आनंद आहे की बाधीत लोकांना घर मिळतात. परंतु याठिकाणी हे करत असताना तानाजी खाडे यांनी

प्रश्न उपस्थित केला, सुलभाताईनी प्रश्न उपस्थित केला. अनेकांनी प्रयत्न केलेले आहेत. आमदारांनी सांगीतले आहे त्यांना मोबदला मिळावा, त्यांना घर मिळावीत याबद्दल कोणाचही याठिकाणी दुमत नाही. आयुक्त साहेब आणि एडीटीपीचे पण अधिकारी याठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की एका बाजुने प्राधिकरण, दुसऱ्या बाजूने महापालिका आहे. या रुंदीकरणामध्ये प्राधिकरणाच्या जागेमध्ये असलेल्या ज्या झोपडया होत्या किंवा जी कच्ची घरे होती त्यांना से.२२ मध्ये विनामोबदला शिफ्ट आपण केलेले आहे. प्राधिकरणाचे अतिक्रमण काढत असताना त्यांना आपल्याकडे सामावुन घेतले त्यावेळेला त्यांच्याकडून आपण कुठल्याही प्रकारचा मोबदला प्राधिकरणाकडून मागीतलेला नाही. याठिकाणी १६ कोटी ३ महिन्यात भरले नाहीतर १४ टक्के दराने व्याज घेणार आहेत. म्हणजे तानाजी खाडे यांच म्हणण असं आहे की आपल्या बरोबर प्राधिकरण असं का वागतय. ५०० ऐवजी ७०० च घर देता आलतरी बघा, ७०० ऐवजी ९०० च घर देता येतय का बघा त्या लाभधारकांना घर देण्यासाठी विरोध नाही परंतु आम्ही सहकार्याची भूमिका घेतलेली असताना प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये असलेल्या घराना आपण आपल्याकडे स्थलांतरीत केलेले आहे काहीही पैसे न घेता, काहीही अटी न टाकता. आता आपल्याला आपल्या लोकांच्या पुनर्वसनासाठी जर जागा लागणार असेलतर ती जागा त्यांनी एकतर अल्प दरात दयावी किंवा त्यांनी सुध्दा मोफत देण्याचा प्रयत्न करावा. प्रशासनाने किमान असेतरी प्रयत्न करावेत की आम्ही तुमचे लोक अशा त-हेने स्थलांतरीत केलेले आहेत तिथं आम्ही तुमच्याकडून कुठलाही मोबदला घेतलेला नाही. तुमचे रस्त्यावरील अतीक्रमण आम्ही काढलेले आहे आणि आमच्या क्षेत्रामध्ये त्यांना आम्ही सामावून घेतलेले आहे असे असताना या लोकांना साम्रावण्यासाठी तुमच्याकडून जागा घेतो त्या जागेपोटी आपण आमच्याकडून जे पैसे घेतात त्यामध्ये आम्हांला काहीतरी कन्सेशन रेट दयावा किंवा मानवतेचा दृष्टिकोन ठेवून तुम्ही तशाप्रकारचे व्याज न लावता किमान दरामध्ये यांच पुनर्वसन व्हावे. आडीच एफएसआय अजून महापालिकेला प्राप्त झालेला नाही. आडीच एफएसआय हा पीसीएनटीडीएला मंजूर झालेला आहे. त्या ब्लॅन्क लाईनमध्ये ईडब्ल्यूएसची लाईन नसावी त्यामुळे आडीच एफएसआय आपल्याला मिळेल का नाही ही शंका आहे परंतु या लोकांनी किमान जी घरांची मागणी केली आहे तेवढे घरतरी यांना मिळाले पाहिजे. नाहीतर आपण त्यांना आडीच एफएसआयच्या हिशोबाने पैसे दयायचो आणि उदया आडीच एफएसआय त्या भूखंडावर देता आला नाही आणि उदया आपण म्हणालो एवढी घर त्यांना देता येणार नाहीतर मग ती मात्र त्या लोकांचीही फसवणूक नको आणि या सभागृहाचीही फसवणूक नको. तरी या सर्व गोष्टी प्रशासनाने पडताळून पहाव्यात, खात्री करावी. या लोकांना महासभेनी जी मान्यता दिलेली आहे तेवढे घर भेटलेच पाहिजे. या सर्व गोष्टीची शाश्वती प्रशासनाने घ्यावी आणि विषय मंजूर करावा अशी विनंती करतो.

**मा.महेशदादा लांडगे -** आदरणी महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या संदर्भात सुलभाताईनी, सिमाताईनी, योगेश बहल, तानाजी खाडे, सुरेश म्हेत्रे यांनी मते मांडलेले आहेत. हा विषय असा आहे की त्यांना १२५० का आडीच एफएसआय देण्याचा पुर्णपणे अधिकार शासनाचा आहे. आम्ही उपसूचना दिली त्यामध्ये ५२ ते ६० मी. यामध्ये जी घरे येतात त्यांना १२५० स्क्वे.फुटाचा प्लॉट मिळावा आणि ज्यांना १२५० स्क्वे.फुट प्लॉट हवा आहे त्यांना आडीच एफएसआय मिळणार नाही. आम्ही सभागृह नागरीकांबरोबर आहे. त्यांना १२५० स्क्वे.फुटाचा प्लॉट मिळावा. आता जो पुनर्वसनासाठी जागेचा मोबदला देतो. ३०० मी. चा स्पेस हा महापालिकेच्या हद्दीतील रस्ता आहे. महापालिकेच्या हद्दीतील नागरीकांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी ही महापालिकेची आहे. महापालिकेनी त्या संदर्भात प्रस्ताव २०१३ ला प्राधिकरणाकडे सबमीट केलेला होता. त्यामध्ये उलट असं लिहीलेल होत ५०० ते ७५० आणि १००० स्क्वे.फुट एवढा प्लॉट त्या लोकांना मिळावा. त्या प्लॉटच्या विरोधात नागरीक, स्थानिक लोकप्रतिनीधी आहेत म्हणून ही उपसूचना देतोत. याच्यामध्ये जे लोक बेघर झाली त्यांचे पुनर्वसन करणे महापालिकेचे काम होते. त्यावेळेला ते केलेले नाही. त्यांना आतापर्यंतचा मोबदला मिळावा याबद्दल सुध्दा त्या उपसूचनेमध्ये अंतर्भाव आहे. तरी हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

**मा.अजीत गव्हाणे -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार मित्र. याठिकाणी हा विषय खुप जनानी प्रयत्न करुन सभागृहापुढे आणलेला आहे लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी तेथील लोकप्रतीनिधीनी खुप प्रयत्न केलेले आहेत. सगळयांनीच आपल्या भाषणामध्ये उल्लेख केला. सुलभाताईनी सुरवातीला सांगीतले आहे की, पुर्वी दोन्ही बाजूला ७५ मी. च्या मध्ये ९० मी.चा रस्ता होता तरी तुम्ही कॉमन ५२ ते ६० मी. चा रस्ता बाधीत होतो तो ताब्यात घेण्यासंबंधीची कारवाई याठिकाणी करता. त्याच्यामध्ये बाधीत मिळकती आहेत त्या मिळकतधारकांना आपण प्राधिकरणाच्या माध्यमातून जागा देण्याचा प्रयत्न करतो. याच्यामध्ये एक त्रुटी राहून गेली असे मला वाटते. त्याला उपसूचना सुरेश म्हेत्रे आणि भालेकरताईनी दिलेली आहे. त्याच्यामध्ये सगळयांचीच मागणी आहे की त्या लोकांना १२५० स्क्वे.फुट मिळावे आणि आडीच एफएसआय मिळावा. त्याच्यामध्ये हे बांधत असताना जेव्हा आडीच एफएसआय मिळेल तेंव्हा जो मार्जीनचा विषय आहे आणि जो नियमावलीचा विषय आहे याचा सुध्दा विचार केला गेला पाहिजे आणि तशी प्रशासनाने आम्हांला माहिती दिली पाहिजे खरंच अशा पध्दतीने या लोकांना आडीच एफएसआय वापरता येईल का, जर शासनाने मंजूरी दिली आणि त्याच मार्जीन वगैरे सगळया गोष्टी विचारात घेतल्यातर त्यांना जे अपेक्षीत आहे आणि आम्हांला, लोकांना जे अपेक्षीत आहे ते खरच होणार आहे का याचा सुध्दा विचार झाला पाहिजे कारण आम्ही सभागृहात विषय मंजूर करु आणि परत पुढे जावुन तो आडकायला

नको. त्यामुळे जे कोणी अधिकारी असतील त्यांच्याकडून या संदर्भात खुलासा करावा नंतर पुढे जावुन आडायला नको त्यामुळे याचा खुलासा घ्यावा.

**मा.रामदास बोकड -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो–पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उदयान विकसित करणे टप्पा-२ या कामाचा मनपाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात समावेश असुन (अंदाजपत्रक पा.क्र.३२४ व अ.क्र.१७८) कामाची प्रशासकीय मान्यता र.रु. १,००,००,०००/- इतकी आहे. परंतू प्रत्यक्षात सदर कामास र.रु. २,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी पन्नास लाख) इतका खर्च अपेक्षित आहे त्यामुळे सदर कामास र.रु. २,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.दोन कोटी पन्नास लाख फक्त) चे सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो–मनपाच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात पान क्र. ३२१ अ.क्र.१२२ मध्ये प्रभाग क्र. ३७ महात्मा फुले पर्यावरण संस्कार उदयानामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०,००,०००/- इतकी आहे. सदर कामाच्या नावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत यावी. प्रभाग क्र. ३७ महात्मा फुलेनगर मोकळी जागा क्र. ५० येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे व अन्य स्थापत्य विषयक कामे करणे, सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७५,००,०००/- आहे तरी सदररच्या कामाच्या नावामध्ये व अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये करावयाची दुरुस्तीस मान्यता देणेत यावी.

**मा.कैलास थोपटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी. २००७ सालापासूनचा हा विषय आहे. हा खरंतर खुप दिवस विषय पेंडींग होता. आज या विषयाला यश आलेले आहे. हा विषय म्हणजे नागरीकांच्या खुप जिव्हाळयाचा प्रश्न होता. ज्यावेळेला प्राधिकरणाकडून भक्ति-शक्ती चौकातून आणि त्रिवेणीनगर या दोन्हीकडून बघीतलतर सगळया प्राधिकरणाच्या इमारतीला त्यावेळेला अडचण येत होती त्याच्यानंतर आपण हा ७५ मी.चा रस्ता केला. मला एवढच म्हणायच आहे की सगळयांनी सगळया गोष्टी सांगीतल्या आहेत. परंतु शरदनगरमध्ये ज्या काही गोष्टींची त्रुटी राहीली ती त्रुटी होवू नये. कारण आजही शरदनगरमधील जे आठ लोक आहेत त्यांना घरे मिळालेली नाहीत. मी प्राधिकरणाकडे खुप फॉलोअप घेतला तरी या गोष्टीमध्ये त्यांनी दिलेली जागा आणि बाधीत असणारे घर म्हणजे नागरीकांवर कुठेही अन्याय होवू नये. सर्व सदस्य या सर्व नागरीकाना मदत करत असतात.

परंतु काही चुका होतात तरी त्याच्यामध्ये सात आठ लोक शरदनगरमधली आजही त्यांना जागा मिळालेली नाही. तरी तसे याबाबतीत कुठे घडू नये एवढच मी याप्रसंगी सांगू इच्छिते आणि हा विषय म्हेत्रे यांनी दिलेली उपसूचना घेवून मंजूर करावा.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज स्पाईन रोडच्या अनुषंगाने हा विषय प्रशासनाने सादर केलेला आहे. यावर सदस्यांनी आपले मत प्रदर्शीत केलेले आहे. यामध्ये सन्मा.गव्हाणे यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने सांगतो की आडीच एफएसआय मंजूर करणेत यावा आणि त्या अनुषंगाने बांधकाम करण्यासाठी जी काही सवलत नियंत्रण नियमावलीनुसार संबंधीत भुखंडधारकांना लागेल त्याचप्रमाणे सवलत डेव्हलपमेंट ऑथोरेटी तो भूखंड प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये असल्यामुळे त्याठिकाणी बांधकाम परवानगी देण्यासाठीचे अधिकार प्राधिकरणाला आहेत. प्राधिकरणाच्या डीसी रुलमध्ये सवलतीचे अधिकार हे डेव्हलपमेंट ऑथोरेटी म्हणून त्यांना आहेत. त्या अनुषंगाने योग्य त्या सवलती संबंधीत नागरीकांना दयाव्यात अशी विनंती त्यांना आपण केलेली आहे त्याप्रमाणे डेव्हलपमेंट ऑथोरेटीच्या बैठकीत मी सदस्य असल्यामुळे तशी विनंती मी त्यांना पर्सनली केलेली आहे, त्या अनुषंगाने त्यांनी पॉझिटीव्ह आपल्याला सांगीतलेले आहे.

**मा.महेशदादा लांडगे -** आदरणीय महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्या जागेचा आपण ले-आऊट केलेला आहे ५००, ७५०, १००० स्क्वे.फुट असे लोकांनी जागा स्विकारल्या. तरी तो जो लेआऊट महापालिकेनी केला त्यामध्ये चार-चार, पाच-पाच लोकांचा क्लब करुन त्याचा प्लॅन केलेला आहे. पण ५००, ७५०, १००० स्क्वे.फुट नागरीक स्विकारणार नाहीत म्हणून ही उपसूचना दिलेली आहे आणि ही उपसूचना फक्त ५२ ते ६० मी. मध्ये येणा-या नागरीकानाच हा लाभ मिळावा त्याच्यामध्ये कोणाचही नुकसान होणार नाही. सुलभाताईनी सांगीतलेला ७५ मी.चा विषयच नाही. हा फक्त ६० मी. मधल्या नागरीकांची जी घरे जातात, आणि चार वर्षापुर्वी ज्यांची घरे गेलेली आहेत त्यांच्या मोबदल्याचा विषय आहे. आपण जो लेआऊट केला त्यामध्ये ५००-५०० चे आपण प्लॉट केले आणि ते क्लब केले. २ गुंठयाचा, ४ गुंठयाचा, ५ गुंठयाचा, ६ गुंठयाचा असे क्लब करुन आपण प्लॅन करणार आहात.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्लॅन करण्यासाठी ज्या काही सवलती लागतील त्या देण्यासाठी प्राधिकरणाने इच्छा प्रदर्शीत केलेली आहे. प्राधिकरणाच्या अधिका-याशी चर्चा करुन त्यांच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार आपण लेआऊट तयार केलेला आहे.

**मा.शांताराम भालेकर -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्पाईनचा विषय झालेला आहे हा त्या परिसरात राहणा-या नागरीकांच्या भावनेशी खेळणारा

विषय आहे. अनेक जणांनी सांगीतले आहे हा अनेक वर्षापासूनचा प्रलंबीत विषय आहे. सभागृहात अनेकवेळा आलेला आहे. गेली चार वर्षे या विषयावर चर्चा होते फक्त चर्चा होवून उपयोग नाही. याच्यामध्ये डिसीजन फार महत्वाच आहे. नगररचनाच्या अधिका-यांनी सांगीतले आहे. परिस्थिती अशी आहे की अनेक वर्ष त्या परिसरातील नागरीकांच्या भावनेशी आपण खेळतो. त्यांना फक्त देतो देतो असं आपण म्हणतो, ते वैतागलेले आहेत. हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.महापौर -** उपसूचना स्विकारली आहे का.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, फक्त मा.सुरेश म्हेत्रे यांची एक उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७५३ विषय क्रमांक - ५

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.नरवि/कावि/१८/५८/ २०१५ दि.८/९/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीवहद्दीच्या भागश: मंजूर विकास योजनेत मौजे तळवडे ता. हवेली जि. पुणे, त्रिवेणीनगर चौक हद्दीतून जाणा-या मंजूर विकास योजनेमधील ९०.० मी. स्पाईन रस्त्याच्या भूसंपादनाबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सन २००५ मंध्ये सादर करणेत आला आहे. सदर स्पाईन रस्ता हा प्राधिकरण हद्द,तळवडे हद्द व पुन्हा प्राधिकरण हद्द यानुसार विभागत आहे. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे क्षेत्रात सदर ९०.० मी.रस्त्याच्या दोन्ही बाजूस ७५.० मी.रूंद रस्ता विकसित करणेत आल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतही ७५.० मी.रूंद रस्ता विकसित करणेबाबत मा.महापालिका सभेने ठराव पारित केला आहे. तदअनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ नुसार फेरबदलाची वैधानिक कार्यवाही सुरू केलेली आहे. परंतु जागेवरील प्रत्यक्ष आखणीनुसार प्राधिकरण व महानगरपालिकेच्या ७५ मी. आखणीत तफावत असल्याने काही नागरिकांचा सदर आखणीस विरोध आहे. त्यामुळे प्रस्तावित ७५ मी. रूंद रस्त्यापैकी प्रथम टप्पा अंतर्गत ५२.० ते ६०.० मी.रस्त्याचे भूसंपादन चालू करणेत आले आहे. व सदर भूसंपादनापोटी भूमिसंपादन अधिकारी, विशेष घटक क्र.१ यांचे कार्यालयाकडून मागणी केलेनुसार जमिनीचा मोबदला रकमेपोटी रक्कम रू.७,९३,५७,३४९/- इतकी रक्कम दि.२८/०५/२०१३ पर्यंत जमा करणेत आली आहे.

सदर ५२ ते ६० मी. रस्त्यामंध्ये अस्तित्वातील घरे आहेत. प्राधिकरण हद्दीतील ७५ मी. स्पाईन रस्त्यामधील बाधित होणा-या मिळकतधारकांचे ज्या प्रकारे पुनर्वसन करणेत आले,त्याच पद्धतीने महानगरपालिकेच्या हद्दीतीलही मिळकतधारकांचेही पुनर्वसन करणेत यावे अशी मागणी

स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी केलेली आहे, तसेच लोकप्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत पुनर्वसनाबाबतच्या आवश्यक त्या भूखंडाची मागणी प्राधिकरणाकडे करावी,असे ठरले. प्रस्तुत प्रकरणी प्राधिकरणाने जागा देणेची तयारी दर्शविल्याने विशेष बाब म्हणून बाधितांचे पुनर्वसन होऊ शकते.त्यानुसार तत्कालीन परिस्थितीत बाधित होणा-या बांधकामाचे क्षेत्रानुसार तीन प्रवर्ग धारकांची यादी प्राथमिक स्वरूपात तयार करणेबाबत ठरले आहे, व त्यानुसार खालीलप्रमाणे वाटप करण्यात येणा-या भूखंडाच्या क्षेत्राची वर्गवारी करणेत आली आहे.

१) ० ते ५०० स्के.फूटापर्यंत बांधकामाने बाधित होणा-या मिळकतधारकांसाठी द्यावयाचे भूखंड क्षेत्र- ५०० स्क्वे.फूट

२) ५०१ ते ७५० स्के.फूटापर्यंत बांधकामाने बाधित होणा-या मिळकतधारकांसाठी द्यावयाचे भूखंड क्षेत्र- ७५० स्क्वे.फूट

३) ७५१ स्क्वे.फूट ते पुढील बांधकामाने बाधित होणा-या मिळकतधारकांसाठी द्यावयाचे भूखंड क्षेत्र- १००० स्क्वे.फूट

यापूर्वी प्राथमिक स्वरूपात सुमारे १११ बाधित मिळकतधारकांची माहिती प्राप्त झाली होती. व सदर मिळकतधारकांचे बाधित होणारे बांधकाम क्षेत्रानुसार, प्राधिकरणाकडे सुमारे १.४२ हेक्टर जागेची मागणी करणेत आली होती.त्यानुसार प्राधिकरणाकडून संबधित बांधकाम बाधित मिळकतधारकांना पर्यायी जागा देणेबाबत शासनाची मंजूरी घेणेबाबत प्रस्ताव सादर केला होता.सदर प्रस्तावाबाबत शासनाने बाधित होणा-या मिळकतधारकांची यादी कळविणेबाबत मागणी केली होती.

तदअनुषंगाने बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांचे पुन:श्र्च सर्वेक्षणानुसार सुमारे १२६ मिळकतधारकांची माहिती प्राप्त झाली.संबधित मिळकतधारकांचे करसंकलन विभागाकडील मिळकतींचे प्राप्त क्षेत्रानुसारची यादी प्राधिकरणांस कळविणेत आलेली आहे. वर नमूद केलेप्रमाणे तीन प्रवर्गात सदर विभागणी करणेत आली. त्यानुसारची माहिती पुढीलप्रमाणे

१) ० ते ५०० स्के.फूटापर्यंत बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांसाठी संख्या- ४९

२) ५०१ ते ७५० स्के.फूटापर्यंत बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांसाठी संख्या-१९

३) ७५१ स्क्वे.फूट ते पुढील - बाधित होणा-या बांधकाम मिळकतधारकांसाठी संख्या – ५८

एकूण संख्या-१२६

तथापि विद्यमान लोकप्रतिनिधी व नागरिक यांनी प्रत्येकी १२५०चौ.फूटाचा मोकळा भूखंड मिळण्याची मागणी केलेली आहे तथापी ते शक्य नसल्याने देण्यातयेणा-या भूखंडास २.५

वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) मंजूर करावा, अशी मागणी केली आहे. सदर बहुतांश बाधित मिळकतधारक हे आर्थिकदृष्टया कमकुवत असून त्यांची अस्तित्वातील घरे निष्कासित करणेत येणार असल्यामुळे महानगरपालिकेकडून २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाची (एफ.एस.आय.) मिळणेविषयी प्राधिकरणाकडे मागणी केलेली आहे.

प्राधिकरणाने पाठविलेल्या पत्रात नमुद केल्यानुसार से.क्र.२ मधील बल्क लँड क्र.१ ते ४ क्षेत्र १४७५४ चौ.मी. जागा प्रचलित निवासी दराने आकारणी करून महानगरपालिकेस थेट वाटप करणेस शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महह्नगरपालिका यांचेकडून आवश्यक त्याबाबींची पूर्तता करून घेवून जागा वाटपाची कार्यवाही करावी. तसेच उपरोक्त नमूद क्षेत्र महापालिकेला हस्तांतरीत करणेपूर्वी सन २०१५-१६ च्या प्राधिकरणाच्या शिघ्रसिद्ध गणकाच्या दराने अधिमूल्य र.रू.१६,५२,११,२००/- प्राधिकरणाचे कार्यालयात ३ महिन्याच्या मुदतीत रोख अथवा डिमांड ड्राफ्टने चलनाने जमा करावी. तसेच या मुदतीत उपरोक्त रकमेचा भरणा केला नाही तर थकीत रकमेवर १४% दराने १ महिना कालावधीसाठी विलंब शुल्क आकारून मुदतवाढ दिली जाईल सदर रकमेवर प्रचलित नियमाप्रमाणे व दराने सेवा कराची रक्कम महापालिकेला भरावी लागेल असेही उपरोक्त पत्रात स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

सदर स्पाईन रस्ता प्राधिकरण हद्दीत विकसित झालेला असून, महानगरपालिका हद्दीत विकसित झालेला नसल्याने वाहतूकीस अडथळा होत आहे त्यामूळे सदर रस्त्याचा विकास होणेची तातडी लक्षात घेता व बाधित क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात मिळणेकरिता, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेसमवेत वेळोवेळी बैठका आयोजित केलेल्या आहेत.

वर नमुद प्रथम टप्पा अंतर्गत ५२ ते ६० मी. रस्त्यासाठीचे भूसंपादनापोटी भूमि संपादन अधिकारी, विशेष घटक क्र. १ यांचेकडे आजपर्यंत म.न.पा.कडुन रू. ७,९३,५७,३४९/- इतकी रक्कम भरणेत आलेली आहे, व बाधित बांधकाम मिळकतधारकांचे पुनर्वसनासाठी प्राधिकरणाकडे भूखंडासाठी भरावी लागणारी रक्कम रू.१६,५२,११,२००/- व तदअनुषंगिक खर्च अशा दोन प्रकारे मोबदला रक्कम सद्यस्थितीत अदा करावी लागत आहे.तथापि भूसंपादनापोटी दोनदा मोबदला देणेची तरतूद नाही, त्यामुळे तुर्त ररू.१६,५२,११,२००/- व तदअनुषंगिक खर्चाची रक्कम महानगरपालिकेकडून पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणास अदा करावी वती बाधित बांधकाम मिळकतधारकांकडून त्यांच्या बाधीत होणा-या भूखंडाचा ताबा घेवून त्यांना लागू होणारी मोबदला रक्कम वजा करून उर्वरित रक्कम वसुल करणे विषयी धोरणात्मक निर्णय घ्यावा,असे वाटते. तसेच जागेचा ताबा मिळाल्यानंतर भूसंपादनातून सदरचे क्षेत्र वगळून त्यांचेकडे जमा केलेली रक्कम परत मिळू शकते.

रक्कम रू.१६,५२,११,२००/- इतकी रक्कम व तदअनुषंगिक खर्चाची (उदा. सेवा कराची रक्कम इ.) रक्कम प्राधिकरणाकडे भरणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेऊन, सदरच्या खर्चास मा. स्थायी समिती सभेचीही मंजूरी घ्यावी लागेल. या सर्व मंजूरी घेण्यासाठी वेळ लागणार आहे. सबब सदर रक्कम भरणेकामी विलंब शुल्क न आकारता मुदतवाढ देणेबाबत प्राधिकरणांस कळविणेत आले आहे.

सबब वर नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे तळवडे ता हवेली जि. पुणे येथील त्रिवेणीनगर चौक येथून जाणाऱ्या स्पाईन रस्त्यामध्ये बाधित मिळकतधारकांच्या पुनर्वसनासाठी जागा वाटप करणेकामी, प्राधिकरणाकडे से.क्र.२ मधील बल्क लँड क्र.१ ते ४ क्षेत्र १४७५४ चौ.मी. चे भूखंडापोटी रक्कम रूपये १६,५२,११,२००/- व तदअनुषंगीक खर्च (उदा. सेवा कराची रक्कम, रजिस्ट्रेशन फी, वकील फी, भूमि अभिन्यास तयार करणेकामीची फी, इत्यादी) करणेचे,तसेच प्राधिकरणाकडून भूखंड म.न.पा.कडे हस्तांतरीत केलेनंतर प्राधिकरणाचे नियमानुसार रेखांकन तयार करणेसाठी व वेळोवेळी फेरबदल करणे, मंजूरी घेणे, जागा वाटप करणे, भूखंडाचे मुल्यांकन निश्चित करणे, रक्कम वसूल करणेचे अधिकार इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देणे या प्रयोजनासाठी, मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे तसेच विषयांकित स्पाईन रस्त्याचे रुंदीकरणातील त्रिवेणीनगर चौक येथील प्रस्तावित ७५ मी.रुंद रस्त्यापैकी सामाईक आखणीप्रमाणे प्रथमत: ५२ ते ६० मी. रुंदीनुसार प्रत्यक्षात बाधित होणा-या मिळकतधारकांचे प्राधिकरणाने शरदनगर अंकुश चौक या भागात केलेल्या पुनर्वसनाचे धर्तीवर प्राधिकरणाकडून मिळणा-या वरील भुखंडावर पुनर्वसन करावे. बाधित मिळकतधारकांबरोबर मोकळया असलेल्या भुखंडधारकांची ही यामध्ये गणना करावी व हे भूखंड विनामुल्य मिळावेत याबाबत बाधित लोकांकडुन कुठलाही मोबदला घेणेत येऊ नये. तसेच यापुर्वी पाण्याच्या पाईपलाईन टाकातांना सन २०१३ साली जी बांधकामे यापुर्वीच काढुन टाकणेत आली आहेत त्या सुमारे १८ बांधकाम मधील लोक हलाकीच्या परिस्थितीत खाजगी भाडयाने राहत आहेत. त्यांचे २०१३ पासुन आजपर्यंत झालेल्या खर्चापोटी म.न.पा. नियमाप्रमाणे नुकसान भरपाई देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्वरित कार्यवाही करावी.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७५४ विषय क्रमांक - ६

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.राहूल भोसले, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.
२) क प्रभाग समिती सभा दि.२/९/२०१५ ठराव क्र.१३०
३) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र. कक्षे/कावि/१२३/२०१५ दिनांक ५/९/२०१५

मौजे पिंपरीवाघेरे मधील नेहरुनगर गावठाण (दाटवस्ती) भागांमध्ये महानगरपालिकेमार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ठिकठिकाणी १० फुट रुंदीचे रस्ते प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

तथापि सुधारित मंजुर विकास योजनेतील ७.०० मी. रुंद रस्त्यांपासून सि.स.नं. ५०३९ पै.५०३३, ५०२७,५०२५,५०२५/१,५०२६ मिळकतीमधील १० फुट रुंदीचा रस्ता वापरात नसल्याने त्या रस्त्याची आवश्यकता नाही तरी सदर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये प्रस्तावित केलेला सदरचा सि.स.नं. ५०३९ पै.५०३३, ५०२७,५०२५,५०२५/१,५०२६ मिळकतीमधील १० फुट रुंदीचा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ७५५ विषय क्रमांक - ७

दिनांक - १९/९/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. निवडणुक/१/कावि/४२९/२०१५ दि.१८/०९/२०१५
२) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र. निवडणुक/१/कावि/४२८/२०१५ दि.१८/०९/२०१५

मा.भारत निवडणूक आयोग यांच्याकडील पत्र क्र.२३/१/२०१५-ERSदि.२७/२/२०१५ व मा.मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.सहमुनिअ-२०१५/०१३/३३

दि.१८/३/२०१५ नुसार दि.३/३/२०१५ पासून राष्ट्रीय मतदार यादी शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम(NERPAP) सुरु करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत आधार क्रमांक व मतदार ओळखपत्र याची जोडणी, नवीन मतदार नोंदणी, मतदार ओळखपत्रातील त्रुटींची दुरुस्ती व मयत, दुबार, स्थलांतरित मतदारांची नावे वगळणेबाबत कार्यक्रम सुरु केले होते. सदर कार्यक्रमाअंतर्गत २०५, चिंचवड विधानसभा मतदार संघाअंतर्गत १ ते ४२३ मतदान केंद्रातील मयत, दुबार व स्थलांतरीत मतदारांच्या वगळणीबाबत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (B.L.O) यांचेमार्फत दुबार व स्थलांतरीत मतदारांना नोटीसा बजविण्यात आल्या होत्या. त्याबाबत प्राप्त झालेले जबाब, पंचनामे, तसेच अर्जांची छाननी करुन २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघातील मयत(७०३), दुबार (१२७०३) व स्थलांतरीत(६७२९५) असे एकूण ८०७०१ मतदारांची वगळणी प्रस्तावीत असलेबाबत मतदार नोंदणी अधिकारी, २०५, चिंचवड विधानसभा मतदारसंघ यांनी त्यांचेकडील पत्र क्र. निवडणूक/कावि/३५२/२०१५ दिनांक १८/०९/२०१५ अन्वये कळविले आहे.

२०५, चिंचवड विधानसभा मतदार संघांतर्गत मतदान केंद्र १ ते ४२३ साठी प्रस्तावीत वगळणीची यादी मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय, १ ते ४२३ मतदान केंद्राचे पदनिर्देशित ठिकाणी मा. मुख्य निवडणूक अधिकारी,महाराष्ट्र यांचे www.ceo.maharashtra.gov.in, मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचे (www.pune.nic.in) व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (www.pcmcindia.gov.in) या संकेतस्थळावर अवलोकनार्थ उपलब्ध आहे. प्रस्तावित वगळणीबाबत मतदारास दिनांक २५/०९/२०१५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत दावे व हरकती दाखल करणेकामी मुदत देण्यात आलेली आहे.

दिनांक २५/०९/२०१५ नंतर वगळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर कोणत्याही पात्र मतदारास दावे व हरकती दाखल करावयाच्या असल्यास ते नव्याने मा. भारत निवडणूक आयोगाचे नमुना क्रमांक ६, ७, ८ व ८अ द्वारे मतदार नोंदणी अधिकारी, २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालयामध्ये दाखल करु शकतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील २०५, चिंचवड विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थलांतरीत मतदार यांची प्रस्तावित वगळणी करावयाचे नावांचे हरकती/सुचनांसाठी सदरची बाब सर्व मा.नगरसदस्यांच्या अवलोकनार्थ/ निदर्शनास आणून देणेत आली.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.विनोद नढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कै.अविनाश टेकवडे यांचे नुकतेच निधन झालेले आहे ते घरातील एकमेव कर्ते व्यक्ती असल्याने आणि सामाजीक कार्यात कायम त्यांचा पुढाकार असल्याने आणि त्यांना तीन वर्षाचा लहान मुलगा आहे. अशा सर्व परिस्थितीमध्ये मा.शितल शिंदे यांनी आम्हांला विनंती केलेली आहे की तुमच एक महिन्याचे मानधन या कुटूंबाला दयावे. तरी त्यांच्या मागणीप्रमाणे कॉंग्रेस पक्षाच्या वतीने सर्व नगरसेवकांच एक महिन्याचे मानधन त्यांच्या कुटूंबाला देत आहोत. त्याचप्रमाणे बीजेपीने देखील एक महिन्याचे मानधन त्यांना दिलेले आहे तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी सुध्दा एक महिन्याचे मानधन दिलेले आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी. कालच हा विषय सांगीतलेला आहे. कै.अविनाश टेकावडे त्यांच्या कुटूंबात लहान मुलगा आहे. ते घरातील कर्ते होते यादृष्टिकोनातून सर्वानीच त्यांचे पत्र तयार केलेले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने एक महिन्याचे मानधन व सर्व सभागृहाच्या वतीने एक महिन्याचे मानधन त्यांच्या कुटूंबाला देण्यात यावे असा विषय मांडते.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझी सर्व नगरसेवकांना विनंती आहे की आपल्या शहरा मधील फोर्स मोटर्स कंपनीच्या काही भगिनी गेल्या १९ दिवसापासून उपोषणाला बसलेल्या आहेत. सर्व नगरसेवकांना विनंती आहे की, त्या आपल्या वॉर्डातील महिला भगीनी असतील, पुरुष असतील आपण त्यांना भेट देण्यासाठी सर्व नगरसेवकांनी तिथे जावे अशी विनंती आहे. १९ दिवसापासून त्या उपोषणाला बसलेल्या आहेत. तरी त्यांची भेट देवून त्यांना सहकार्य कराव त्यांचा जो काही विषय आहे त्याला आपण मदत करावी अशी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी. दत्तात्रय साने यांनी विषय मांडलेला आहे. हा महिला भगीनींच्या जिव्हाळयाचा विषय आहे. महिला भगिनी फोर्स कंपनी मधल्या उपोषणाला बसलेल्या आहेत. आपण सर्वजण, पिंपरी चिंचवड शहर, जिल्हा त्यांच्या बरोबर आहे. ज्यांना जमेल तसे त्यांनी त्यांच्या अंदोलनामध्ये सहभागी व्हावे अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करते आणि कै.अविनाश टेकवडे यांच्या कुटूंबाला सर्वपक्षीयांनी मदत करावी. याच्यामध्ये तांत्रीक कारण न सांगता या रक्कमेचा एकरकमी चेक देण्यात यावी अशी मी विनंती करते.

**मा.महापौर -** हा चेक सर्वाच्या अनुमतीने देण्यात यावा. सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/३२२/१५
दिनांक - २०/१०/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.